REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांचे स्त्री सुधारणा विषयक दृष्टिकोन



**डॉ. माने ए. एस.**
इतिहास विभाग प्रमुख, श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा,
जि.सोलापूर.

## प्रस्तावना:

आधुनिक भारताच्या प्रबोधन चळवळीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या लेखन व कार्यामधून एकंदरीत दलित त्याचप्रमाणे संपूर्ण भारतीय समाज यामधील अनेक समाज अनिष्ट गोष्टींवर प्रश्न उपस्थित केले.

## उद्दिष्टे:

१) प्राचीन काळापासून स्त्रियांना असणारे आधिकार व आधुनिक समाजव्यवस्थेतील गोणत्व अभ्यासणे.
२) डॉ.आंबेडकरांचे स्त्री समस्येबरील लिखाण स्पष्ट करणे.
३) स्त्री प्रश्नासंदर्भात डॉ.आंबेडकर व इतर विचारवंत यांच्या विचारांची चिकित्सा करणे.

## 1) प्राचीन समाजव्यवस्था

ऋग्वेदातील समाजव्यवस्थेचा दृष्टिकोन खियांच्या बाबतीत उदार असला तरी या काळात कोणत्याही ऋषीने मुलगी जन्माला याबी असे म्हटले नाही. उलट मुलगा जन्माला यावा अशी डच्छा होती. इंग्रज कालखंडात आधुनिक शिक्षण घेतलेल्या बुद्धिवाद्यांनी प्रबोधनाची सुरुवात केली. त्यामध्ये खरी उद्धाराचा पुरस्कार केला. भारतात स्री उद्धाराच्या चळवळीची सुरुवात गोतम बुद्धाने केली. आधुनिक काळात राजाराम मोहन रॉय यांनी त्याची सुरुवात केली असली तरी, म.जोतिबा फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. तसेच केशवचंद्र सेन, विद्यासागर, महर्षी कर्वे व सावित्रीबाई फुले यांचाही संदर्भ महत्त्वाचा आहे. खी सुधारणेच्या बाबतीत फुल्यांचा वारसा दलितांचे केवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

प्राचीन काळापासून भारतात स्त्रीयांचे दोन वर्ग होते. १) सवर्ण किंबा अभिजन वर्गातील स्त्रिया कनिष्ठ किंवा दलित वर्गातील खरिया, दलित स्त्रियाचे जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था व पुरुषसत्ता या तीनही संस्थाकडून शोषण होत होते. या तिहेरी शोषण व्यवस्थेतून मुक्त करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारण कार्यासाठी लढे उभारताना, त्यामध्ये खरियांनाही सहभाग करून घेऊन खी स्वातंत्र्य ब खी-पुरुष समानता निर्माण व्हावी यासाठी त्यांच्यामध्ये जाणीब जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. आधुनिक काळात राष्ट्र विकासात स्री भूमिका महत्त्वाची आहे. हे जर्मनी, जपान, इंग्लंड अमेरिका, चीन या राष्ट्रानी दाखवून दिले. भारतात मात्र, राष्ट्र कार्यात खियांचा सहभाग पुरेसा नाही कारण धर्मव्यवस्थेने त्यांना बंधनात ठेवून स्वतंत्रपणे विचार करण्याची अनुमती दिली नाही. स्त्रियाच्या या परिस्थितीस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनू

व मनुवाद्यांना जबाबदार धरले. त्यामुळे हिंदू धर्मात खरियांची उन्नती होऊ शकत नाही, त्यासाठी बौद्ध धर्मच आवश्यक असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य ब खी-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. पुरुष वर्ग पुढे जाऊन खी वर्ग मागे राहिला तर समाजाची प्रगती होणार नाही. म्हणून स्त्रियानी पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून लढले पाहिजे. असे झाले तर खियांना त्यांचे स्वातंत्रय लवकर मिळेल. असा आशावादही ते व्यक्त करतात. ब्राह्मण हे त्यांच्या स्रियांना शिक्षण देतात, परंतु ब्राह्मणेतर स्त्रियाच्या शिक्षणाला विरोध करतात. ना.गोखले व ना.पटेल यांनी पुरस्कृत केलेल्या सक्तीच्या खी शिक्षणाला ते पाठिंबा देऊन मुलगा व मुलगी असा भेद न करता हे शिक्षण जितक्या लवकर होईल तितक्या लवकर सक्तीचे व मोफत करावे. असा आग्रह करतात. 'खाण तशी माती' ही गोष्ट लक्षात घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भावी पिढी सुधारण्यासाठी खी शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे अशिक्षित असलेली आपली पत्नी रमाबाईस स्वत: शिकवून साक्षर केले व स्वत:च्या घरापासून स्री शिक्षणाची सुरुवात केली.

## २) रूढी व परपरा

बालविवाह प्रथा रूढ असल्याने मुला-मुलींच्या आर्थिक स्वाबलंबनाचा विचार न करता आई बडील त्यांचे विवाह बालवयातच करीत असत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यास विरोध करतात ब आई-वडिलांनी आपल्या मुलांच्या विवाहाची घाई न करता ते जोपर्यंत विवाहामुळे येणारी आर्थिक जबाबदारी पार पाडण्याइतपत सक्षम होत नाही. तोपर्यंत त्यांचे विवाह करू नये, असा सल्ला देतात. मुलांच्या भवितव्याबिषयी आई-वडिलांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देतात ते म्हणतात की, आपल्या लहानपणी मिळू शकली नाही, त्यापेक्षा अधिक चांगली परिस्थिती आपल्या मुलांना निर्माण करून देणे हे आई-वडिलांचे कर्तव्य आहे. आणि त्यासाठी लग्न झालेल्या प्रत्येक खरीने पतीची मेत्रीण म्हणून त्यांच्या कार्यात सहकार्य द्यावे. दासी म्हणून नव्हे असे झाले तर खी ब समाज दोघांचाही अभ्युदय होईल. असे त्यांना वाटत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर खियांच्या संदर्भात फक्त उक्ती करूनच थांबले नाही तर १९४७ मध्ये त्यांनी हिंदू कोड बिल मांडून प्रत्यक्ष कृतीतून खरियांना त्यांचे अधिकार व हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यामध्ये मूल दत्तक घेण्याच्या बाबतीत जातीची बंधने नसावीत. सध्याच्या हिंदू कायद्यात पत्नीसाठी एक पतित्व व पुरूषांसाठी बहुपत्नीत्व प्रथा आहे. हे बंद करून या कायद्याने हिंदूस फक्त एकच विवाह करता यावा.

पती व पत्नी यांचे जमले नाही तर त्यांना घटस्फोट घेता यावा, त्यांना जबरीने एकत्र रहावे लागू नये तसेच मुलींनाही बडिलांच्या संपत्तीत वारसा हक्क देण्यात यावा, इत्यादी मागण्या होत्या. परंतु दुर्देवाने हिंदू कोड बिल संसदेत पास होऊ शकले नाही. जर हे बिल पास झाले असते तर निश्चितच स्रियांना त्यांचे हक ब अधिकार मिळून त्यांच्यावर होणारा अन्याय-अत्याचार कमी झाला असता. ख्री पुरूष समानता निर्माण होण्यास मदत झाली असती.

## ३) स्त्री सुधारणा विषयक कायदे:

प्राचीन काळापासून भारतीय समाज व्यवस्थेत बाल विवाह प्रथा प्रचलित होती. या प्रथेविरोधी १८७२, १९८१ व १९३० साली वेळोवेळी कायदे संमत झाले. परंतु समाजात बालविवाह सुरूच होते. विवाहानंतर मुली या कमी वयात माता होत असल्याने त्याचा परिणाम त्यांचे स्वास्थ्य ब होणाऱ्या संततीवर होत होता. आणि कुटुंब, समाज व राष्ट्रासाठी मातेचे आरोग्यदायी रहाणे ब निकोप संतती निर्माण होणे गरजेचे असल्याने

डॉ.आंबेडकरांनी बालविवाह प्रथेस विरोध करून विवाह प्रसंगी मुलाचे बय २0 तर मुलीचे बय १६ वर्षे एवढे असावे, याचा पुरस्कार केला. आई-वडील आपल्या मुलांच्या विवाहासाठी प्रसंगी कर्ज काढून थाटामाटात विवाह करीत असे.

डॉ.आंबेडकरांच्या मते, विवाहात जास्त खर्च न करता तो कमी करून त्यातील उरलेल्या पेशांचा उपयोग मुलांच्या शिक्षणासाठी करावा असे सांगत. समाजामध्ये आंतरजातीय विवाह काही प्रमाणात होत असत. डॉ.आंबेडकर या विवाहाला आदर्श व सर्व दृष्टीने योग्य विवाह मानत होते. कारण तत्कालीन भारतीय समाज हा विविध जाती.

धर्मामध्ये विभागला होता. त्यामध्ये हिंदू धर्मात आपापल्या जातीतच विवाह होत असल्याने साहजिकच जातिव्यवस्थेचे पालन होत होते. आणि डॉ.आंबेडकर हे जातिव्यवस्थेच्या विरोधी असल्याने त्यांनी पुण्यामध्ये ब्राह्मण जातीच्या प्र.क्र. अत्रे यांनी बेश्य जातीच्या गोदूताई नामक मुलीसोबत विवाह केला. तर लखनो येथे चांभार (अस्पृश्य) जातीच्या मुलाने ब्राह्मण जातीच्या बिधवेसोबत विवाह केला. या दोन्ही विवाहाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समर्थन केले, मात्र हे विवाह त्या जोडप्यांसाठी तापदायक ठरणार, असेही मत ते व्यक्त करतात. जातिव्यवस्थेला सुरुंग लावण्यासाठी डो. आंबेडकरांना मिश्र विवाह महत्त्वाचा वाटत होता. परंतु तत्कालीन कर्मठ जातिव्यवस्थेमुळे आंतरजातीय विवाह करणाऱ्यांनी समाजाचा त्रास सहन करावा लागत असावा असे दिसते.

### ४) कुटुंब व्यवस्था:

कुटुंब छोटे असावे की मोठे असाबे याविषयी तत्कालीन समाजात फारशी जागृती झालेली नव्हती, परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या कुटुंबामुळे होणारा तोटा व छोट्या कुटुंबामुळे होणारा फायदा ओळखला होता म्हणून स्वतःच्या कुटुंबाचे उदाहरण देऊन ते खरियांना मोठ्या कुटुंबामुळे भावी पिढीवर होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देताना स्पष्ट करतात की जास्त अपत्यांचे कुटुंब असेल तर ५०-६० रुपये पगाराच्या नोकरीत तुम्ही त्यांचे योग्य पालन पोषण करू शकत नाही. तेव्हा तुम्हाला जर मुलांना चांगले शिक्षण, चांगला आहार द्यायचे असेल तर त्यासाठी छोटे कुटुंब आवश्यक आहे. आज शासन व समाज दोन्हीही सुखी कुटुंब व राष्ट्रविकासासाठी 'हम दो हमारे दो' हा नारा देऊन छोट्या कुटुंबाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ७५ वर्षापूर्वीच हा नारा देऊन समाजाला छोट्या कुटुंबाचे महत्त्व पटवून देऊन आपल्या दूरदृष्टीचा परिचय दिला. जर समाजाने त्यांचे छोट्या कुटुंबीयांचे विचार स्वीकारले असते त्यातून बोध घेतला असता तर आज देशाच्या वाढत्या लोकसंख्येला आळा बसून देशाने अधिक विकास साधला असता. परंतु तसे होऊ शकले नाही हे देशाचे दुर्दैव आहे.

वर्ण व्यवस्थेमुळे दलित वर्गातील खरियांच्या कामधंद्याच्या स्वातंत्र्यावर बंधने आली होती. त्यामुळे मुंबईतील कामठीपुऱ्यातील काही स्त्रिया मुरळ्या, जोगतीनी व देवदासी इत्यादी अनीतीकारक व्यवसायात पडल्या होत्या.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर या खरियांना सन्मानाने जीवन जगण्याचा सल्ला देताना स्पष्ट करतात की, स्री जात म्हणजे समाजाचा अलंकार होय. प्रत्येक समाज खतरियांच्या चारित्र्याला अधिक मान व महत्त्व देतो. आपली गृहिणी चांगल्या कुळातील असावी, अशी प्रत्येकजण अपेक्षा करतो. कुटुंबाचा, मुलांचा नावलौकिक हा स्त्रीवर अबलंबून असतो.

इतकी थोरवी स्त्री वर्गाला प्राप्त झालेली आहे. परंतु तुमचा चरित्रक्रम पाहिला असता तो खी वर्गाला काळिमा फासणारा असाच आहे. म्हणून तुम्ही खी वर्गाचे समाजातील स्थान ओळखून त्याप्रमाणे वागण्यासाठी या धंद्याचा त्याग करा. अठराविधे दारिद्रयात जीवन जगा, परंतु कष्टाने पेसा मिळवा ब सन्मानाने जीवन जगा यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांना द्रोपदीचे उदाहरण देतात, पांडव द्रोपदीला द्यूतात हरल्यानंतर दुर्योधनाने तिला आपल्यासोबत येऊन ऐश्वर्य संपन्न जीबन जगण्यासाठी सूचित केले होते, परंतु द्रोंपदीने त्यास नकार देऊन जर मला नीतीने आयुष्यक्रम कंठता येत नसेल तर ऐश्वर्य नको, राजवाड्यापेक्षा कष्टमय वनवास मला अधिक प्रिय आहे असे उत्तर दिले. वरील विवेचनावरून आंबेडकर खतियांना दारिद्रयात जीवन जगण्याचा परंतु कष्टाने पैसा मिळवून द्रोपदीप्रमाणे सन्मानाचे जीवन जगण्याचा सल्ला देतात ब समाजातील त्यांचा दर्जा व प्रतिष्ठेची जाणीव करून देतात.

## निष्कर्ष:

अनेक स्त्री प्रश्नांच्या संदर्भात डॉ.आंबेडकरांनी आवाज उठवला. सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात खियांना समता स्वातंत्र्य मिळावे म्हणून लेखन केले. प्रसंगी रस्त्यावर उतरून अनेक चळवळीत सहभाग घेतल्याचे दिसते. आंबेडकरांनी स्री प्रश्नांच्या संदर्भात मांडलेले विचार आजही संयुक्तीक वाटतात म्हणून आज जगात त्यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन अनेक चळवळी झाल्याचे आपणास दिसूनयेते. डा.बाबासाहेब आंबेडकरांनी अगतिक परिस्थितीत जीवन जगणाऱ्या स्री वर्गाला आपल्या अस्पृश्यता निवारण व परिवर्तनवादी लढ्यात सहभागी करून घेऊन आपल्या उद्दीपक विचारांनी उन्नतीचा मार्ग दाखवून दिल्याचे पप्पी म पेचासंनी उन्नतीचा मार्ग दाखवून दिल्याचे दिसते.

## संदर्भ:

१. नरके हरी ब इतर (संपा), डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-२७, Aug, 2004,
२. डॉ.भोसले नारायण, महाराष्ट्रातील स्रीवबिषयक सुधारणवादाचे सत्ताकारण (१८४८-१९५६), पुणे,२००८,
३. साळुंखे आ.ह., हिंदू संस्कृती आणि खी, आठवी आवृत्ती, मुंबई, २००८,
४. मुन वसंत व नरके हरी (संपा), डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-९८ भाग-२, मुंबई,
५. लोकराज्य, माहिती ब जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६.